
ePaper
“...तर पंतप्रधान असताना मोदींनी काय केलं?” ठाकरे गटाचा थेट सवाल



| वर्ष - 7 | अंक - 170 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत

- पाकिस्तानच्या पराभवाचा ‘चौकार’!
- केआरके रणवीरवर भडकला?
- २०१४ च्या आधी फोन हँग व्हायचे!
- अंगणवाडी मदतनीसांना पदोन्नती!

www.mahaenews.com | शनिवार, दिनांक 28 ऑक्टोंबर 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# मराठा आंदोलक आक्रमक!

## » विरोधी पक्षनेते अंबादास दानवेंना पिंपरीत दाखवले काळे झेंडे

| पिंपरी | महाईन्यूज | प्रतिनिधी |

**मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरून पिंपरी चिंचवड मध्ये मराठा क्रांती मोर्चा चे आंदोलन आक्रमक झाले आहेत. राज्याचे विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे आज पिंपरी चिंचवड दौऱ्यावर होते. यावेळी त्यांना काळ झेंडे दाखवत निषेध करण्यात आला. एक मराठा लाख मराठा, मराठा आरक्षण मिळालेच पाहिजे अशी जोरदार घोषणाबाजी यावेळी आंदोलकांनी केली.**





विरोधी पक्षनेते अंबादास दानवे हे आज पिंपरी चिंचवड दौऱ्यावर होते. महापालिकेच्या वायसीएम रुग्णालयाला भेट देऊन ते पाहणी करणार होते. मात्र ते शहरात येण्याआधीच मराठा समाजाच्या कार्यकर्त्यांना पोलिसांनी ताब्यात घेतले होते. दानवे वाय सी एम रुग्णालयात दाखल होतास आंदोलकांनी काळे झेंडे दाखवत जोरदार घोषणाबाजी केली. काही क्षणातच या आंदोलकांना ताब्यात घेतले आहे.

राजकीय नेत्यांना मराठा क्रांती मोर्चाच्या आंदोलकांनी पिंपरी चिंचवड शहरात येण्यास बंदी घातली आहे. दरम्यान विरोधी पक्षनेते अंबादास दानवे हे आज पिंपरी चिंचवड दौऱ्यावर होते.

### आक्रमक आंदोलकांशी चर्चा करायला हवी...

दानवे यांना मराठा समाजाच्या संघटनांनी काळे झेंडे दाखवण्याचा प्रयत्न केला, यावर बोलताना त्यांनी आपली भूमिका स्पष्ट केली. अंबादास दानवे म्हणाले, माझा विरोध झालेला नाही, मी ही त्या आंदोलनातील एक कार्यकर्ता आहे. मी त्यांना भेटण्याच्या तयारीत होतो. दसरा मेळाव्यात उद्धव ठाकरे यांनी मराठा आरक्षणाबद्दल भूमिका मांडलेली आहे. मी मराठवाडा येथील आहे. जरांगे पाटलांच्या नेहमीच संपर्कात असतो. आंदोलक आक्रमक आहेत, त्यांच्याशी चर्चा करायला हवी होती. मराठा आरक्षणाची मागणी ही जुनी आहे. जरांगे पाटील यांच्या आंदोलनामुळे या आंदोलनाला, मागणीला धार आली आहे. मराठा समाजाच्या तरुणांचा सरकारने अंत पाहू नये. मराठा समाजाला आरक्षण मिळालं पाहिजे. आरक्षणाची ५० टक्के मर्यादा वाढवली तर आरक्षण मिळू शकत. राज्य आणि केंद्रसरकार या प्रश्नाकडे दुर्लक्ष करत आहे. कृषी विषयी नऊ वर्षात पंतप्रधानांनी काय केले हे उत्तर त्यांनी द्यायला हवं.



“ मराठा समाजाची आरक्षणाची मागणी ही पूर्वीची आहे. जरांगे पाटलांच्या आंदोलनामुळे या मागणीला धार मिळालेली आहे. मराठा समाजाची मागणी लवकरात लवकर राज्य आणि केंद्र सरकारने पूर्ण करावी, मराठा समाजाच्या तरुणांचा सरकारने अंत पाहू नये. मराठा समाजाच्या आरक्षणाला माझा विरोध नाही. मी देखील त्या आंदोलनातील एक कार्यकर्ता आहे.

– **अंबादास दानवे,** विरोधी पक्षनेते

---

# पिंपरी-चिंचवडच्या गिर्यारोहकांची माउंट एव्हरेस्ट बेस कॅम्पवर यशस्वी चढाई

## » मोहिमेत नऊ गिर्यारोहकांनी सर केले 5 हजार 364 मीटर उंचीचे शिखर

| पिंपरी | महाईन्यूज | प्रतिनिधी |

**पिंपरी-चिंचवड शहरातील नऊ गिर्यारोहकांची तब्बल 5 हजार 364 मीटर उंचीवर चढाई करत माउंट एव्हरेस्ट बेस कॅम्प मोहीम यशस्वीपणे पूर्ण केली. सर्वत्र बर्फ, थंड वातावरण, जीवघेणी अवघड वळणे, खडी चढण अशा संकटांचा सामना करत भोसरी इंद्रायणीनगर येथील या नऊ गिर्यारोहकांनी 13 दिवसांची ही खडतर मोहीम पथ्ये केली.**



एव्हरेस्ट शिखराच्या दक्षिणेस तब्बल 5 हजार 364 मीटर आणि 17 हजार 598 फूट उंचीवर माउंट एव्हरेस्ट बेस कॅम्प आहे. प्रत्यक्षात माऊंट एव्हरेस्टवर चढाई करण्यातील हा महत्त्वाचा टप्पा मानला जातो. नेपाळ काठमांडून मार्गे या ठिकाणी पोहोचता येते. वर्षातून फक्त चार महिने ही मोहीम गिर्यारोहकांना करता येते. भोसरीतील इंद्रायणीनगर परिसरातील गिर्यारोहक मयुरेश धनंजय जाधव, नेहा मुयरेश जाधव, ऐश्वर्या विलास मडिगेरी, प्रसाद पितांबर वाघमारे, कुणाल रमेश पवार, कुशांग चेतन ढोलकिया, संचिता दिनेश लाहोट, रचना अश्विन शहा आणि चिरायू अश्विन शहा यांनी ही मोहीम यशस्वीपणे पूर्ण केली आहे. मोहिमेत एका बाजुने 62 किमी, तर दोन्ही बाजुने हे अंतर 124 किमी चालत पार केले. दररोज ते 30 हजार पावले चालत त्यांनी हा खडतर प्रवास पूर्ण केला. ते सर्व 30 सप्टेंबरला 2023 काठमांडूला पोहोचले. 1 ऑक्टोबरला त्यांनी चढाईला सुरुवात केली आणि 12 ऑक्टोबरला हा संपूर्ण प्रवास पूर्ण केला.

“ “संयम, दृढनिश्चय आणि सहनशक्तीच्या जोरावर केलेल्या मोहीमेत आश्चर्यकारक, चित्तथरारक आणि अनोख्या संस्कृतीचा अनुभव मिळाला. शारीरिक आणि मानसिक तंदुरुस्तीसाठी सराव आवश्यक आहे. त्यासाठी गरजेचा आहे. मोहिमेपूर्वी तीन महिने सलग सराव केला. त्या करिता महाराष्ट्रातील राजगड, सिंहगड, कळसुबाई शिखर, आंदरबन जंगल, भिमाशंकर जंगल, हरिशचंद्र गड येथे ट्रेक केले. सरावामुळे माउंट एव्हरेस्ट बेस कॅम्पची ही खतर मोहीम आम्ही यशस्वीपणे पूर्ण करू शकलो.

– **मयुरेश जाधव,** गिर्यारोहक

# शस्त्र बाळगण्याबाबत निर्बंध!

## जिल्हाधिकारी डॉ. देशमुख यांचे आदेश

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**जिल्ह्यात होणाऱ्या 231 ग्रामपंचायती तसेच 157 ग्रामपंचायतीच्या पोटनिवडणुकांच्या पार्श्वभूमीवर ग्रामपंचायतींच्या कार्यक्षेत्रात फौजदारी दंड प्रक्रिया संहिता 1973 चे कलम 144 कलम व तसेच शस्त्र अधिनियम 1959 चे कलम 17(3)(ए) व (बी) अन्वये जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख यांनी 9 नोव्हेंबरपर्यंत निर्बंध आदेश लागू केले आहेत.**



### शस्त्रे संबंधित स्टेशनला जमा करावी

» पोलीस अधीक्षक पुणे ग्रामीण यांच्याकडून जामिनावर सोडलेल्या व्यक्ती, दंग्यामध्ये गोवलेल्या व्यक्ती व निवडणूक कालावधीत दंग्यामध्ये गोवलेल्या व्यक्ती तसेच राजकिय हितसंबंधातून त्यांच्याकडील असलेल्या शस्त्राचा गैरवापर होण्याची शक्यता असलेल्या शस्त्र परवानाधारक व्यक्तींनी त्यांच्याकडील शस्त्रे संबंधित पोलीस स्टेशनला जमा करावीत. तसे आदेश पोलीस विभागाने संबंधित शस्त्र परवानाधारकांना बजवावेत. शस्त्र परवानाधारकांनी आदेश प्राप्त होताच ताबडतोब व कोणत्याही परिस्थितीत सात दिवसांच्या आत शस्त्र जमा करावीत. 9 नोव्हेंबर नंतर 7 दिवसांच्या आत संबंधितांना त्यांचे शस्त्र परत करावीत.

दिनांक 9 नोव्हेंबरपर्यंत परवानाप्राप्त अग्नीशस्त्रे जवळ बाळगण्यास मनाई - ग्रामपंचायत निवडणूक कार्यक्रमाअंतर्गत 5 नोव्हेंबर रोजी मतदान होणार आहे. तसेच 6 नोव्हेंबर रोजी मतमोजणी, 7 नोव्हेंबर रोजी नक्षलग्रस्त तसेच दुर्गम भागात मतमोजणी होणार आहे.

मतदान व मतमोजणीच्या दिवशी नागरिकांना स्वत:जवळ परवानाप्राप्त अग्नीशस्त्रे, हत्यारे, दारुगोळा बाळगण्यास व बरोबर नेण्यास मनाई करण्यात आली आहे. या आदेशातून बंदोबस्तासाठी असणारे अधिकारी, कर्मचारी तसेच बँका व सार्वजनिक मालमत्तेच्या सुरक्षिततेसाठी नेमण्यात आलेले सुरक्षा कर्मचारी यांना वगळण्यात आले आहे. बँका अथवा सार्वजनिक संस्था तसेच या कालावधील सुट देण्यात आलेल्या व्यक्ती यांनी निवडणूक कालावधीत त्यांच्याकडील हत्यारांचा गैरवापर होणार नाही याची जबाबदारी राहील.

# पुणे - कोल्हापूर विशेष रेल्वे सुरू होणार

। पुणे ।महाईन्यूज ।
प्रतिनिधी।



रेल्वे प्रशासनाने प्रवाशांच्या मागणीनुसार दररोज पुणे - कोल्हापूर - पुणे अशी विशेष गाडी पाच नोव्हेंबर ते ३१ डिसेंबर दरम्यान सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे पुणे - कोल्हापूर प्रवास करणाऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

कोल्हापूर, पुणे मुंबई दरम्यान धावणारी सह्याद्री एक्स्प्रेस सुरू करण्याची मागणी अनेक दिवसांपासून सुरू केली जात आहे. ही गाडी सुरू करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. पण, रेल्वे प्रशासनाने दिवाळीच्या काळात पुणे - कोल्हापूर - पुणे अशी दररोज विशेष रेल्वे गाडी सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. या गाडीला सर्व महत्वाच्या २० रेल्वे स्थानकावर थांबा देण्यात आला आहे. त्यामुळे ही गाडी प्रवाशांना खूपच फायदेशीर ठरणार आहे. या गाडीला १६ कोच असणार आहेत. या सेवेसाठी महाराष्ट्र एक्स्प्रेसचा रेक वापरण्यात येणार आहे. पाच नोव्हेंबर ते ३१ डिसेंबर दरम्यान या गाडीच्या ११४ फेऱ्या होणार आहेत. याबाबतचे नोटीफिकेशन शुक्रवारी रेल्वे प्रशासनाने काढले आहे.

पुणे - कोल्हापूर ही गाडी पुण्यातून रात्री नऊ वाजून ४५ मिनिटांनी सुटणार आहे. ती गाडी कोल्हापूर येथे पहाटे ५ वाजून ४० मिनिटांनी पोहोचेल. तर, कोल्हापूर येथून ही गाडी रात्री ११ वाजून ३० मिनिटांनी सुटेल. ही गाडी दुसऱ्या दिवशी सकाळी सात वाजून ४५ मिनिटांनी पुण्यात दाखल होईल.

# आंद्रा प्रकल्पाच्या पाण्यासाठी चिखली ग्रामस्थ एकवटले!

## चिखली जलशुद्धीकरण केंद्रातून स्वतंत्र पाणी उपसा पंप

। पिंपरी ।महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**चिखली आणि परिसरातील सुमारे ९० हजार नागरिकांच्या पाणीपुरवठा सक्षम करण्यासाठी महापालिका प्रशासनाच्या माध्यमातून चिखली जलशुद्धीकरण केंद्रातून थेट पाईपद्वारे पाटीलनगर येथील जलकुंभात पाणी पुरवठा करण्यासाठी स्वतंत्र पंप बसवण्यात आला आहे. त्याचे लोकार्पण आमदार महेश लांडगे व समस्थ ग्रामस्थ चिखली यांच्या हस्ते करण्यात आले. या निमित्ताने चिखलीतील ग्रामस्थ एकवटल्याचे चित्र पहायला मिळाले.**



आंद्रा प्रकल्पातील १०० एमएलडी पाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी चिखली येथे महापालिका प्रशासनाने जलशुद्धीकरण केंद्र उभारले आहे. या केंद्रातून पिंपरी-चिंचवडसह समाविष्ट गावांना पाणी पुरवठा करण्यात येणार आहे. मात्र, चिखलीला आणि परिसराला या प्रकल्पातून पाणी देण्यात येणार नाही, असा दावा काही लोकांनी केला होता.

वास्तविक, पाटीलनगर येथे महापालिका प्रशासनाने २० लाख लीटर क्षमतेचा जलकुंभ उभारला आहे. या टाकीमध्ये पवना प्रकल्पातील रावेत बंधाऱ्यातून सुमारे १६ एमएलडी पाणी दिले जाते. एक दिवस २० ते २२ तास आणि दुसऱ्या दिवशी तीन ते चार तास पाणी पुरवठा होतो. आता प्रशासनाने आंद्रा प्रकल्पातील पाण्यासाठी चिखली येथे नवीन जलशुद्धीकरण केंद्र उभारले आहे. त्यातील पाणी पाटीलनगर येथील पाण्याच्या टाकीत आणण्यासाठी ६०० एमएम पाईपलाईन टाकली आहे. त्यासाठी स्वतंत्र पाणी उपसा पंपही कार्यान्वयीत केला आहे. त्यामुळे पवना आणि आंद्रा अशा दोन्ही प्रकल्पाचे पाणी उपलब्ध झाल्यामुळे पाणी पुरवठा सुरळीत होण्यास मदत होणार आहे.

विशेष म्हणजे, आंद्रा प्रकल्पाच्या अध्यादेशातच चिखली गावचा समावेश असल्यामुळे चिखलीला पाणी पुरवठ्यापासून वंचित ठेवण्यात येईल हे मिथक होते. यावर शिक्कामोर्तब झाले आहे. चिखली व परिसरातील पाणी पुरवठ्यावरुन राजकारण पेटले असताना मात्र, चिखली ग्रामस्थांनी एकोप्याचा संदेश दिला. आमदार महेश लांडगे यांच्या पुढाकाराने आंद्रा प्रकल्पातील पाण्यासाठी स्वतंत्र पंपचे लोकार्पण करण्यात आले. यावेळी माजी महापौर राहुल जाधव, माजी नगरसेवक सुरेश म्हेत्रे, कुंदन गायकवाड, सुनिल लोखंडे, दिनेश यादव, स्वीनल म्हेत्रे, सुरेश म्हेत्रे, साधना मळेकर, गिताराम मोरे, अश्विनी जाधव, सामाजिक कार्यकर्ते विनायक आबा मोरे, सोनम मोरे, अंकुश मळेकर, अमृत सोनवणे, यशवंत साने, पांडाभाऊ साने, निलेश नेवाळे, किसन बावकर, प्रदीप आहेर, विष्णू मोरे, फेडरेशनचे अध्यक्ष संजीवन सांगळे, जितेंद्र यादव, निलेश लोखंडे, नवीन बग, संतोष वाघरे, संदीप शेलार, संतोष जाधव, दत्ता मोरे, गणेश भुजबळ, अविनाश मोरे, संदीप नेवाळे, तुकाराम जाधव, सदाशिव नेवाळे, सविता दाते, किर्ती मोरे, प्रतिभा चौधरी, हेमलता सोनवणे, मनिषा ठोंबरे, कार्यकारी अभियंता रामनाथ टकले, मीनल दौंडल अभियंता रमेश जिंतीकर, सोसायटींचे चेअरमन, प्रतिनिधी आदी उपस्थित होते. ग्रामस्थांनी आंद्रा प्रकल्पाबाबत समाधान व्यक्त केले.

### पाणी पुरवठा होणार सक्षम: मोरे

» आंद्रा प्रकल्पातून अतिरिक्त पाणी उपलब्ध झाल्यामुळे पाण्याची टाकी भरण्यास मदत होईल. टाकीसाठी सध्या एक पंप आहे. आणखी एक पंप उपलब्ध करण्याबाबत प्रशासन प्रयत्न करीत आहे. त्यामुळे जास्तीत-जास्त पाणीसाठा होण्यास मदत होईल. चिखली गावठाण, रामदासनगर, नागेश्वर विद्यालय, रामदास नगर टप्पा, महादेवनगर, भांगरे कॉलनी, धर्मराज नगर, शेलारवस्ती, पाटीलनगर, देहू-आळंदी रस्ता, राम मंदिर डिफेन्स कॉलनी या भागातील पाणी पुरवठा सक्षम होणार आहे, अशी माहिती सामाजिक कार्यकर्ते विनायक आबा मोरे यांनी दिली.

# शहरात 63 ठिकाणी हॉकर्स झोन !

## फेरीवाला समिती बैठकीत महापलिका आयुक्तांची मंजुरी


। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड शहरात विविध ६३ ठिकाणी हॉकर्स झोन निश्चित करण्यात आले आहेत. तेथे तब्बल ४ हजार १९४ विक्रेत्यांना व्यवसाय करता येणार आहे. शहर फेरीवाला समितीच्या बैठकीत समितीचे अध्यक्ष तथा महापालिकेचे आयुक्त शेखर सिंह यांनी त्यास मंजुरी दिली आहे.**



महापालिकेत नुकत्याच झालेल्या बैठकीस अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, भूमी व जिंदगी विभागाचे सहाय्यक आयुक्त विजयकुमार सरनाईक व क्षेत्रीय अधिकारी तसेच, शहर फेरीवाला समितीचे सदस्य उपस्थित होते.

या बैठकीमध्ये शहरांमधील विविध भागांमध्ये जे फेरीवाले व्यवसाय करत आहेत, त्यांच्यासाठी त्याच भागांमध्ये हॉकर्स झोन किंवा फेरीवाले क्षेत्र निर्माण करण्याचे



ठरविले आहे. ज्या भागात जास्त प्रमाणात रहदारीस अडथळा निर्माण होतो, अशा ठिकाणी प्राधान्याने हॉकर्स झोन निर्माण करण्यात येणार आहे. तेथील रस्ते व चौक मोकळे करण्यात येणार आहेत. फेरीवाल्यांमुळे रहदारीस अडचणी निर्माण होते. तसेच, पदपथावर अतिक्रमण झाल्याने फेरीवाल्यांवर अतिक्रमण विभागामार्फत कारवाई होते, अशा फेरीवाल्यांना यामुळे दिलासा मिळणार आहे. ज्या फेरीवाल्यांमुळे रहदारीस अडचणी निर्माण होतात, तसेच फुटपाथवरील फेरीवाल्यांवर वारंवार अतिक्रमण विभागामार्फत कारवाई होते, अशा फेरीवाल्यांना दिलासा मिळणार आहे.

### प्रभाग हॉकर्स झोन

| प्रभाग | हॉकर्स झोन |
|---|---|
| अ 4 | 92 |
| ब 6 | 370 |
| क 8 | 1052 |
| ड 12 | 346 |
| इ 8 | 257 |
| फ 7 | 1060 |
| ग 12 | 570 |
| फ 6 | 457 |
| **एकूण 63** | **4204** |

### फेरीवाल्यांसाठी जागेचे भाडे निश्चित

» हॉकर्स झोनमध्ये शहरातील अधिकृत फेरीवाले यांना क्षेत्रीय अधिकारी, अतिक्रमण विभाग व विविध फेरीवाला संघटना यांच्या समन्वयातून जागा वाटप करण्यात येणार आहे. फेरीवाल्यांसाठी जागेचे भाडे निश्चित करण्यात आले आहे... जागेचे भाडे दिल्यानंतर फेरीवाल्याला त्या जागेचा वापर करता येणार आहे, सहाय्यक आयुक्त विजयकुमार सरनाईक यांनी सांगितले.

### कागदपत्रे जमा करण्यास पुन्हा मुदतवाढ

» दरम्यान, शहरातील ग आणि ड क्षेत्रीय कार्यालयात प्रत्येकी 12 तर सर्वात कमी अ क्षेत्रीय कार्यालयात फक्त 4 हॉकर्स झोन निश्‍चित करण्यात आले आहेत. क क्षेत्रीय क्षेत्रीय कार्यालयात 8 झोन असून 1 हजार 52 तर फ क्षेत्रीय कार्यालयात सात झोन असून 1 हजार 60 हॉकर्सची व्यवस्था करण्यात आली आहे.

शहरातील फेरीवाल्यांचे सर्वेक्षण करण्यात आले. यामध्ये शहरात 19 हजार 697 फेरीवाले असल्याचे स्पष्ट झाले आहे. मात्र, यामधील तब्बल 5 हजार 75 फेरीवाल्यांची कागदपत्रेच महापालिकेकडे जमा केली नव्हती. या फेरीवाल्यांना कागदपत्रे जमा करण्यासाठी 20 ऑक्टोबरपर्यंत मुदत दिली होती. मात्र, मुदतवाढ देण्याची मागणी फेरीवाल्यांनी केली होती. त्यानुसार 7 नाव्हेंबरपर्यंत कागदपत्रे जमा करण्यास मुदतवाढ देण्यात आल्याचे सहाय्यक आयुक्त विजयकुमार सरनाईक यांनी सांगितले.

# गुणवंत खेळाडू घडविण्यासाठी आमदार महेश लांडगे यांचा पुढाकार!

## माजी नगरसेवक शांताराम भालेकर यांचे मत; रुपीनगर शिक्षण प्रसारक मंडळास कबड्डी मॅट सुपूर्द

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**खेळाडूंच्या आणि कलाकारांच्या बाबतीत भोसरी विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेश लांडगे यांचे नेहमीच विशेष सहकार्य लाभले आहे. विद्यार्थ्यांनी केवळ बौद्धिकदृष्ट्या गुणवान न होता शारीरिक दृष्ट्या सुद्धा सदृढ होणे गरजेचे आहे. शहरात दर्जेदार खेळाडू घडावेत. यासाठी भाजपा आमदार महेश लांडगे यांचा सकारात्मक पुढाकार असतो, असे मत माजी नगरसेवक शांताराम भालेकर यांनी व्यक्त केले.**




रुपीनगर शिक्षण प्रसारक मंडळाचे ज्ञानदीप माध्यमिक व सौ. अनुसया वाढोकार उच्च माध्यमिक विद्यालयांमध्ये पुणे जिल्हा क्रीडा अधिकाऱ्यांच्या वतीने व भोसरी विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेश लांडगे यांच्या विशेष सहकार्यातून विद्यार्थ्यांसाठी 'इनडोअर' कबड्डी खेळण्यासाठी कबड्डी मॅट प्रदान करण्यात आले. या वेळी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

यावेळी रुपीनगर शिक्षण प्रसारक मंडळ संस्थेचे खजिनदार भागवत चौधरी, समन्वय समितीचे अध्यक्ष संपत भालेकर, धनंजय वर्णेकर, रमेश भालेकर, अस्मिता भालेकर, अनिल भालेकर, सचिव सूर्यकांत भसे, रामदास कुटे, ज्ञानेश्वर भालेकर, प्राचार्य सुबोध गलांडे, ज्येष्ठ नागरिक संघाचे पदाधिकारी, नागरिक उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्था समन्वय समितीचे अध्यक्ष संपत भालेकर होते.

### गुणवंत खेळाडून निर्माण व्हावे : भालेकर

**» शाळेसाठी लागणाऱ्या आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आमदार महेश लांडगे यांचे सदैव सहकार्य लाभणार आहे. ओपन जीमसाठी लागणारे साहित्य, लॉज बॉल साठी लागणारे मैदान, तसेच गुणवान विद्यार्थ्यांच्या विकासासाठी लागणाऱ्या पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी संस्थेला आवश्यक असणारे सर्व प्रकारचे सहकार्य केले जात आहे. शाळेची गुणवत्ता अत्यंत चांगली असल्यामुळे या संस्थेतून अतिशय गुणवंत खेळाडू ही निर्माण झाले पाहिजे, अशी अपेक्षाही माजी नगरसेवक शांताराम भालेकर यांनी व्यक्त केली.**

प्रास्ताविकात संस्थेचे सचिव सूर्यकांत भसे सर म्हणाले की, संस्थेला क्रीडा क्षेत्रामध्ये नावलौकिक करण्यासाठी आवश्यक ते सर्व प्रयत्न केले जातील. मुलांसाठी चांगले मैदान आहे. खेळाचे साहित्यही उपलब्ध करून दिले जाईल. परंतु त्याचा सर्व विद्यार्थ्यांनी आवश्य लाभ घेतला पाहिजे.

कार्यक्रमाचे अध्यक्ष संपत भालेकर यांनी अध्यक्ष मनोगत व्यक्त केले. या वेळी विद्यालयाचे प्राचार्य सुबोध गलांडे यांनी सर्वांचे स्वागत केले.

विद्यार्थ्यांच्या क्रीडा गुणांना वाव देण्यासाठी संस्थेला आमदार महेश लांडगे यांनी विशेष सहकार्य केल्याबद्दल त्यांच्या बद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. बाळासाहेब पवार यांनी आभार मानले.




# सरकारच भांबावलेले, तर लोकांचे काय?

**सामान्य भारतीय माणूस अचानक व्यवस्थेच्या केंद्रस्थानी आला. तेव्हा स्वीकारलेला समाजवादी मार्ग सोडून आपण १९९१ मध्ये जागतिकीकरण, उदारीकरण आणि खासगीकरण वळणावर आलो! या तीन 'करणां'पाठोपाठ आणखी एक 'करण' भारतात आलं. ते म्हणजे व्यावसायिकीकरण! देशात मोठ्या प्रमाणावर परदेशी गुंतवणूक आली.**

बँकांची कर्जं मिळणं सुलभ झालं आणि प्रत्येक गोष्टीचं, प्रत्येक क्षेत्राचं व्यावसायिकीकरण झालं. यातून शिक्षण आणि आरोग्य ही मूलभूत क्षेत्रंही सुटली नाहीत. सरकारची या दोन क्षेत्रांमधील गुंतवणूक कमी होत गेली.




'आशिया पॅसिफिक ऑब्झर्व्हेटरी ऑन हेल्थ सिस्टीम्स अ‍ॅण्ड पॉलिसीज'च्या २०२२ च्या अंकात भारतातील आरोग्य व्यवस्थेचा आढावा घेतला आहे. या अहवालात भारतातील आरोग्य व्यवस्थेवर ताशेरे ओढले आहेत. धोरणांमध्ये आरोग्य क्षेत्राला प्राधान्य देण्याच्या घोषणा वारंवार होऊनही केंद्र आणि राज्य सरकारांनी सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेसाठी नेहमी तुटपुंजी तरतूद केली, असं हा अहवाल म्हणतो. ती किती तुटपुंजी तर आपल्या देशाच्या सकल राष्ट्रीय उत्पन्नापैकी फक्त ३.८ टक्के एवढाच वाटा आपण सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेसाठी राखून ठेवतो. २०१६-१७ च्या अर्थसंकल्पात १२९१ अब्ज रुपये आपण खर्च केले होते. ही रक्कम तर आपल्या सकल राष्ट्रीय उत्पन्नाच्या फक्त एक टक्का एवढीच आहे.राज्याचा विचार करता वैद्याकीय आणि सार्वजनिक आरोग्यावर होणारा एकूण खर्च १९९५ ते २०२० या २५ वर्षांत नक्कीच वाढला आहे. वैद्याकीय, सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब यावर १९९६ मध्ये ९०,६११ लाख रुपये खर्च होत होता. २०२० मध्ये म्हणजेच २५ वर्षांनी तो ५,०८,७७८ लाख रुपयांवर पोहोचला. ही वाढ भरघोस दिसत असली, तरी आरोग्यावर होणारा खर्च हा इतर विभागांच्या तुलनेत कमीच आहे. त्यामुळे तुलनात्मक अभ्यास केला, तर आरोग्याच्या खर्चात १९९५ ते २०२० या काळात फारशी वाढ झालेलीच नाही. २०१४-१५ ते २०२१-२२ या सात वर्षांच्या कालखंडात राज्याच्या अर्थसंकल्पात ६७,३८५ कोटी रुपयांची तरतूद केली होती. सुधारित अंदाजपत्रकात हा खर्च ८४,५७८ कोटी रुपयांपर्यंत गेला. प्रत्यक्षात मात्र या सात वर्षांमध्ये प्रतिवर्षी सरासरी ९,३४७ कोटी रुपयांप्रमाणे ७१,५६७ कोटी रुपये खर्च झाले. पण सार्वजनिक आरोग्य व्यवस्था सुधारण्यासाठी त्याचा फायदा नक्कीच झालेला दिसत नाही.पली सरकारी आरोग्य व्यवस्था प्राथमिक उपकेंद्र, प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालय आणि जिल्हा रुग्णालय अशा चार खांबांवर उभी आहे. त्याशिवाय वैद्याकीय शिक्षण विभागाकडून वैद्याकीय महाविद्यालयं चालवली जातात. या रुग्णालयांमधील आणि वैद्याकीय महाविद्यालयांमधील ५० टक्क्यांपेक्षा जास्त कर्मचारी कंत्राटी पद्धतीने कामावर आहेत. त्यामुळे ग्रामीण भागातील आरोग्य व्यवस्था खूप खराब झालेली आहे. राज्यभरातील गेल्या काही आठवड्यांतील घटना याच निष्काळजीपणाचा आणि दुर्लक्षाचा परिणाम आहेत. राज्यातील आरोग्य यंत्रणेची लक्तरं प्रसिद्धीमाध्यमांमधून टांगली गेल्यानंतर राज्य सरकार खडबडून जागं झालं. त्यातही दोष कोणाचा, हे अद्यापही निश्चित झालेलं नाही आणि आरोग्यमंत्र्यांनी तर संपूर्ण मंत्रिमंडळच जबाबदार असल्याचं विधान केलं. मुख्यमंत्री महोदयांनी राज्यातील आरोग्य व्यवस्थेसाठी 'व्हिजन २०३५' जाहीर केलं. यात आरोग्य व्यवस्थेसाठीचा खर्च दुप्पट करण्यापासून ३४ जिल्हा रुग्णालयं तयार करणं, रिक्त पदं भरणं असे अनेक निर्णय त्यांनी घेतले. त्याबद्दल त्यांचं अभिनंदन! पण ही घसघशीत तरतूद होण्यासाठी सरकारी रुग्णालयांमध्ये रुग्णांचे बळी जाणं आवश्यक होतं का?

अगदी दोन वर्षांपूर्वीच देशभरात आरोग्याची आणीबाणी निर्माण झाली होती. करोना महामारीने आपल्या देशातील आरोग्य यंत्रणेचं पितळ उघडं पाडलं होतं. अनेक शहरांत वाहनतळांमध्ये खाटा टाकून तात्पुरती रुग्णालयं सुरू करावी लागली होती. पण त्यातूनही आपल्या सरकारांनी धडा घेतला नाही. गेल्या दोन अर्थसंकल्पांमध्ये आरोग्य विभागासाठी भरीव तरतूद अपेक्षित होती, पण प्रत्यक्षात तसं काही घडलं नाही.

## संपादकीय »

# बाबू ते बाबूराव!

***हल्ली सहकारी राजकारण्यांपेक्षा हाताखालील अधिकाऱ्यांमार्फत राजकारण करण्याकडे आणि प्रशासन चालवण्याकडे कल मोठ्या प्रमाणावर वाढू लागलेला आहे.***

किरण बेदी, सत्यपाल सिंग, व्ही. के. सिंग, न्या. रंजन गोगोई, हरदीपसिंग पुरी, अश्विनी वैष्णव, एम. एस. गिल, विजय कुमार सिंग, अरविंद कुमार शर्मा, चंद्रमोहन मीना, ओ. पी. चौधरी, श्रीनिवास पाटील, नीलकांत टेकम आणि आता व्ही. के. पांडियन... ही सर्व विविध पदांवर सरकारी सेवेत काम केलेल्या अधिकाऱ्यांची नावे आहेत, हे लक्षात आलेच असेल. हे सर्व सक्रिय राजकारणात आहेत वा होते. पण सर्वच असे नाहीत. उदाहरणार्थ टेकम वा पांडियन. आपल्या पदाचा राजीनामा देऊन हे टेकम थेट निवडणुकीच्या मैदानात उतरले. त्याआधी अर्थातच ते भाजपत सामील झाले. हा त्यांच्या पक्षप्रवेशाचा सोहळा राजकारणी प्रतिस्पर्ध्यास लाजवेल असा होता. काही हजार जणांची मिरवणूक, मोटारसायकल्स आणि मोटारींचा जामानिमा त्यांच्या या राजकीय प्रवेशाच्या साजरीकरणासाठी तयार होता. सध्या छत्तीसगड विधानसभा निवडणुकांत भाजपने त्यांस उतरवले आहे.

**विद्युत पुरवठा तसेच वितरण करणाऱ्या महावितरणकडून नवीन वर्षापासून ग्राहकांसाठी स्मार्ट मीटर मोफत बसविण्यात येणार आहेत. विजेची थकबाकी राहू नये म्हणून ही एक चांगली संकल्पना महावितरण रा स्मार्ट मीटर बसवल्यानंतर विजेच्या बिलाचा भरणा झाला नाही तर लगेचच विद्युत पुरवठा खंडित होणार आहे. परिणामी प्रामाणिक ग्राहकांना या समस्येचा विनाकारण सामना करावा लागणार. बवू इच्छित आहे.**

# विद्युत मीटरचे स्मार्ट नियोजन

ती प्रत्यक्षात साकार होताना खालील काही बाबींचा विचार जरूर व्हावा. कारण काही वेळेला नजरचुकीने वीज बिलाचा भरणा करणे राहून जाते. अशा वेळी त्या व्यक्तीचा विद्युत पुरवठा ताबडतोब खंडित न करता वीज ग्राहकाला सात दिवसांच्या मुदतीची सुविधा असावी आणि तसे सूचित करण्यात यावे. या मुदतीत बिलाचा भरणा न केल्यास त्वरित विद्युत पुरवठा खंडित होण्याची यंत्रणेत सोय असावी.

विद्युत पुरवठा, वितरण करणाऱ्या महावितरणने प्रत्येक ग्राहकाकडून दोन महिन्यांच्या बिलाएवढी रक्कम सुरक्षा ठेव म्हणून घेतलेली आहे. स्मार्ट मीटर बसवल्यानंतर सुरक्षा ठेव महावितरणला स्वतःकडे ठेवून घेण्याची आवश्यकता नाही. सबब ही सुरक्षा ठेव प्रत्येक ग्राहकाला पूर्णतः परत करावी. यासाठी खालील पर्यायाचा विचार करता येईल. महावितरणकडे सुरक्षा ठेव म्हणून शिल्लक असलेली दोन महिन्यांची रक्कम ग्राहकांना परत




करताना ती बिलातून वजा करावी किंवा स्मार्ट मीटरची वसूल करण्यात येणारी रक्कम सुरक्षा ठेवीमधून वजा करावी आणि तसे ग्राहकांना सूचित करावे.

स्मार्ट मीटरची किंमत ३३००/- रुपये आहे त्यापैकी १८००/- रुपये केंद्राकडून सहाय्य म्हणून मिळणार आहेत उरलेल्या १५००/- रुपयांचा ग्राहकांच्या खिशावर ताण येणार आहे. महावितरणने वीज नियामक आयोगाची परवानगी घेऊन ही रक्कम ग्राहकांकडून वसूल करताना स्मार्ट मीटर असा वेगळा रकाना निर्माण करून त्यामध्ये वसूल केल्या जाणाऱ्या रकमेचा उल्लेख असावा. सुरक्षा ठेवीमधून स्मार्ट मीटरसाठी लागणारी रक्कम वजा केल्यानंतर उरलेली ठेव मासिक बिलातून वजा करून ग्राहकांना दिलासा द्यावा. स्मार्ट मीटरमुळे सुरक्षा ठेव घेण्याची गरज उरली नाही. त्यानंतर हा रकाना रद्द करण्यात येऊन वसुली बंद करावी आणि सुरक्षा ठेव हा कॉलम रद्द करावा. स्मार्ट मीटरची किंमत : ३३००/- रुपये. केंद्र सरकारकडून मिळणारी रक्कम १८००/- रुपये वजा करता बाकी रक्कम उरते ती म्हणजे १५००/- रुपये. ही रक्कम वसूल करण्यासाठी ग्राहकांवर येणारा ताण पाहता, दहा वर्षाच्या कालावधीत होणारी अतिरिक्त वसुली : ४३२०-१५००=२८२०/- रुपये प्रत्येक ग्राहकामागे. म्हणजे एकूण २.७३ कोटी. ग्राहकांकडून लूटमारीच्या स्वरूपात वसूल करण्यात येणारी रक्कम किती असेल ? याचाच अर्थ महावितरण ग्राहकांकडून मोठ्या प्रमाणात कशी लुटमार करणार हे सिद्ध होते. थोडक्यात महावितरण केंद्राकडून मदत मिळत असतानाही अशी अवाढव्य लुटमार करू पहात आहे.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# मी पुन्हा येईनमुळे राजकीय गदारोळ!

## भाजपाकडून 55 मिनिटांत व्हिडीओ डिलिट

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राज्याच्या राजकारणात पुन्हा एकदा खळबळ उडवून देण्याच्या प्रयत्नात भाजपाने अवघ्या तासाभराच्या आतच त्यांची एक पोस्ट डिलिट केली आहे. मी पुन्हा येईन असं घोषवाक्य असलेला देवेंद्र फडणवीस यांचा व्हिडीओ अवघ्या तासाभरात मागे घ्यावा लागल्याने आता विरोधकांकडून विविध प्रतिक्रिया येऊ लागल्या आहेत. ठाकरे गटाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनीही याप्रकरणी भाजपा आणि देवेंद्र फडणवीसांवर टीका केली आहे.**





उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सपशेल नापास गृहमंत्री ठरलेले आहेत. त्यांच्यावर जनतेची नाराजी आहे आणि पक्षश्रेष्ठींचीही नाराजी आहे. त्यामुळे पक्षश्रेष्ठींनाच सांगण्यासाठी की मीच पुन्हा येऊ शकतो. मीच सर्वयोग्य आहे. त्याचवेळेला महाराष्ट्राच्या जनतेलाही हेच सांगण्याचा प्रयत्न होता", असं सुषमा अंधारे म्हणाल्या. त्या पुढे म्हणाल्या की, "परंतु, ५५ मिनिटांच्या आत ट्वीट डिलिट होतं याचा अर्थ असा आहे की ५५ मिनिटांत असं काय घडलं, पक्षश्रेष्ठींकडून फोन आले का? दिल्लीतून फोन आले का? काय प्रतिक्रिया आल्या का? काहीलोक नाराज होणार होते का?" असे विविध प्रश्नही त्यांनी उपस्थित केले आहेत. "मी पुन्हा येईन. याच ठिकाणी, याच निर्धाराने, नवमहाराष्ट्राच्या निर्मितीसाठी.

मी पुन्हा येईन गावांना जलयुक्त करण्यासाठी, शहरांचा चेहरा बदलण्यासाठी, माझ्या महाराष्ट्राला दुष्काळमुक्त करण्यासाठी. नवमहाराष्ट्राच्या निर्मितीसाठी!" भाजपा महाराष्ट्राने ही कविता काही वेळापूर्वीच पोस्ट केली आहे. ज्यावरुन विविध चर्चा आता सुरु झाल्या आहेत. पुढचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस असतील का? समजा अपात्रतेचा निर्णय झाला तर पुढचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होतील का? एक-ना दोन चर्चा सुरु झाल्या आहेत. इतकंच नाही तर महाराष्ट्र भाजपाने ही कविता पोस्ट केल्यानंतर त्यातल्या उत्तरांमध्येही लोक विविध प्रतिक्रिया देत आहेत. काही युजर्स तर शपथविधी सोहळा कधी आहे? असाही प्रश्न विचारत आहेत. "हा व्हिडीओ सोशल मीडिया मर्यादित आहे", असं केशव उपाध्ये म्हणाले. ते पुढे म्हणाले की, "जनादेश यात्रेतील हा व्हिडीओ आतापर्यंत अनेकदा टाकला गेला आहे. त्यातून कार्यकर्त्यांना प्रेरणा मिळत असते. या आधीच माननीय देवेंद्रजीनीच स्पष्ट केले आहे की,एकनाथ शिंदे हेच मुख्यमंत्री राहतील आणि त्यांच्याच नेतृत्वात आगामी निवडणुका लढविल्या जातील. त्यामुळे कुणीही वेगळा अर्थ काढू नये", असंही स्पष्टीकरण त्यांनी दिलं.

भाजपाने केलेल्या पोस्टमध्ये मी पुन्हा येईनचं घोषवाक्य आहे. त्यामुळे चर्चेला उधाण आलं आहे. मात्र, तासाभराच्या आतच भाजपाने ही पोस्ट डिटिलही केली आहे. तर, यावर भाजपा प्रवक्ते केशव उपाध्ये यांनीही स्पष्टीकरण दिलं आहे. "हा व्हिडीओ सोशल मीडिया मर्यादित आहे", असं केशव उपाध्ये म्हणाले. ते पुढे म्हणाले की, "जनादेश यात्रेतील हा व्हिडीओ आतापर्यंत अनेकदा टाकला गेला आहे. त्यातून कार्यकर्त्यांना प्रेरणा मिळत असते.

या आधीच माननीय देवेंद्रजीनीच स्पष्ट केले आहे की,एकनाथ शिंदे हेच मुख्यमंत्री राहतील आणि त्यांच्याच नेतृत्वात आगामी निवडणुका लढविल्या जातील. त्यामुळे कुणीही वेगळा अर्थ काढू नये", असंही स्पष्टीकरण त्यांनी दिलं.

### शपथविधी सोहळा कधी आहे?

"मी पुन्हा येईन. याच ठिकाणी, याच निर्धाराने, नवमहाराष्ट्राच्या निर्मितीसाठी. मी पुन्हा येईन गावांना जलयुक्त करण्यासाठी, शहरांचा चेहरा बदलण्यासाठी, माझ्या महाराष्ट्राला दुष्काळमुक्त करण्यासाठी. नवमहाराष्ट्राच्या निर्मितीसाठी!" भाजपा महाराष्ट्राने ही कविता काही वेळापूर्वीच पोस्ट केली आहे. ज्यावरुन विविध चर्चा आता सुरु झाल्या आहेत. पुढचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस असतील का? समजा अपात्रतेचा निर्णय झाला तर पुढचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होतील का? एक-ना दोन चर्चा सुरु झाल्या आहेत. इतकंच नाही तर महाराष्ट्र भाजपाने ही कविता पोस्ट केल्यानंतर त्यातल्या उत्तरांमध्येही लोक विविध प्रतिक्रिया देत आहेत. काही युजर्स तर शपथविधी सोहळा कधी आहे? असाही प्रश्न विचारत आहेत.

# अंगणवाडी मदतनीसांना पदोन्नती!

## राज्य शासन प्रयत्नशील असल्याची मुख्यमंत्र्यांची घोषणा

। मुंबई । प्रतिनिधी : महाईन्यूज

**केंद्र सरकारच्या मदतीने राज्य शासन विविध योजनांच्या माध्यमातून महिलांच्या सक्षमीकरणासाठी प्रयत्न करत आहे. राज्यातील तीन हजार अंगणवाडी मदतनीस यांना अंगणवाडी सेविका पदावर पदोन्नती देण्यासाठी राज्य शासन प्रयत्नशील असल्याची घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली.**





आज शिंदे यांच्या हस्ते राज्यातील प्रधानमंत्री मातृ वंदना योजनेतील ८ लाख १४ हजार मातांना ३२१ कोटी ५७ लाख रूपयांचे ऑनलाईन वाटप करण्यात आले. यशवंतराव चव्हाण सेंटर येथे केंद्रीय महिला व बालविकास मंत्रालयाच्यावतीने आयोजित 'प्रधानमंत्री मातृवंदना योजनेबाबत जनजागृती कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून मुख्यमंत्री शिंदे बोलत होते. मुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, नवरात्र संपल्यानंतर मातेला वंदन करण्याचा हा कार्यक्रम आहे. महिला या मातृशक्ती असून समाज, नवीन पिढी घडविण्याचे काम करत असल्याने ती आदिशक्तीही आहे. केंद्र सरकारच्या मदतीने महिलांच्या समस्या सोडविण्यासाठी राज्य सरकार तत्पर आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी संसदेमध्ये महिलांना आरक्षण देवून त्यांचा सन्मान केला आहे. ग्रामीण भागातील महिलांना उघड्यावर शौचास जावे लागत असल्याने त्यांनी स्वच्छ भारत ही मोहीम राबवून घरोघरी लाखो शौचालयांची निर्मिती केली. महिला समर्थ होतील, तरच देशाची प्रगती होईल, हे ओळखून प्रधानमंत्री देशातल्या दीन दलित, दुर्बल महिलांना स्वत:च्या पायावर सन्मानाने उभे करीत आहेत. ग्रामीण भागात लाखो महिलांच्या नावाने घरे करण्यासाठी पीएम आवास योजनेतील घरांवर महिलांची नावे आली आहेत. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी इतिहासात पहिल्यांदाच पोषण ट्रॅकर सुरु करून करोडो मात-मुलांना योग्य रीतीने पोषणाची सेवा मिळते किंवा नाही याची तपासणी सुरु केली.

# आरक्षण मिळेपर्यंत गावांत राजकीय नेत्यांना प्रवेशबंदी!

। मुंबई । प्रतिनिधी : महाईन्यूज

दिवसेंदिवस मराठा आंदोलन तीव्र होताना दिसत आहे. जामखेड तहसील कार्यलयाच्या आवारात मराठा समाजाच्या वतीने साखळी पद्धतीने आंदोलन सुरू असतानाच तालुक्यातील अनेक गावांत आता राजकीय नेत्यांना आता नोएंट्री चा बॅनर झळकले आहेत. त्यामुळे तालुक्यातील सर्वच गावात येत्या काही दिवसात नोएंट्री करणार असल्याचे मराठा क्रांती मोर्चाच्या वतीने सांगण्यात येत आहे. मराठा आरक्षणामुळे आरणगाव कडकडीत बंद होते. मराठा समाजाला जोपर्यंत आरक्षण मिळत नाही तोपर्यंत खासदार, आमदारसह, राजकीय पुढाऱ्यांना जामखेड तालुक्यातील जामखेड शहर सह खर्डा, अरणगाव यासह ३४ गावात गावबंदी करण्यात आली असून ठिकठिकाणी तसे फलक मराठा क्रांती मोर्चाच्या वतीने लावण्यात आले आहेत. येत्या दोन दिवसांत संपूर्ण जामखेड तालुक्यात राजकीय नेत्यांना गावबंधी होणार असल्याचे मराठा क्रांती मोर्चाच्या वतीने सांगण्यात आले आहे. मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील मराठा आरक्षणासाठी आंदोलन करत आहेत. त्यांना पाठिंबा तर नाहीच, उलट त्यांच्या विरोधात चुकीचे विधान केले जात आहे. त्यामुळे गावातील सर्व समाजाने मराठा आरक्षणाला पाठिंबा दिला असून कोणत्याच नेत्याला आम्ही गावात येऊ देणार नाही, असा एकमुखी निर्णय मराठा समाजाच्या वतीने करण्यात आला आहे. जो पर्यंत मराठा आरक्षण मिळत नाही तो पर्यंत विविध पद्धतीने मराठा क्रांती मोर्चाच्या वतीने करण्यात येत आहे.

# 2014 च्या आधी फोन हँग व्हायचे!

## पंतप्रधान नरेंद्र मोदींचा काँग्रेसला टोला

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज (२७ ऑक्टोबर) दिल्लीत ७ व्या इंडिया मोबाईल काँग्रेसच्या कार्यक्रमाला हजेरी लावली. यावेळी त्यांनी देशभरातील निवडक संस्थांमधील १०० नवीन ५ जी लॅबचं उद्घाटन केलं. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले, आपल्या देशात ५ जी नेटवर्क विस्तारत आहे. मोबाइल ब्रॉडबँड स्पीडच्या बाबतीत आपण जगात ४३ व्या क्रमांकावर आहोत. आमच्या सरकारच्या काळात देशात ४ जी सेवा विस्तारली. आता आपण ६ जी तंत्रज्ञानाच्या दिशेने वाटचाल सुरू केली आहे.





दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी यावेळी भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षावर टीका केली. मोदी म्हणाले, २०१४ मध्ये काय झालं होतं माहितीय ना? २०१४ ही केवळ तारीख नाही तर एक परिवर्तन आहे. २०१४ मध्ये देशात केवळ १०० स्टार्टअप होते, आज देशात १ लाख स्टार्टअप आहेत. तुम्ही १०-१२ वर्षांपूर्वीचा काळ आठवून पाहा. तेव्हा आऊटडेटेड मोबाइल फोनची स्क्रीन सतत हँग व्हायची. तुम्ही त्याची बटनं दाबा, स्क्रीन स्वाईप केली तरी फोन काम करत नव्हते. ते फोन रिस्टार्ट करूनही काहीच होत नव्हतं. अशीच अवस्था देशातल्या तेव्हाच्या सरकारची होती. तेव्हाचं सरकार हँग व्हायचं. नरेंद्र मोदी म्हणाले, मोबाइलची आणि देशाची परिस्थिती पाहता देशातल्या लोकांनी आऊटडेटेड फोन आणि आऊटडेटेड सरकार सोडून आम्हाला संधी दिली. २०१४ मध्ये नागरिकांनी आम्हाला देशाची सेवा करण्याची संधी दिली. या परिवर्तनामुळे काय झालं ते सांगायची आवश्यकता नाही. कारण तंत्रज्ञानाच्या जगात आता सगळं काही स्पष्ट दिसतंय. तेव्हा आपण मोबाईल फोन आयात करत होतो. आता आपण मोबाईल फोनची निर्यात करतो. पंतप्रधान यावेळी म्हणाले, इंटरनेटचं स्पीड वाढल्यामुळे आपलं जीवन सुखद झालं आहे. त्यामुळेच आम्ही तंत्रज्ञानावर भर देतोय. याचा सर्वांना फायदा मिळेल यासाठी सरकार काम करत आहे. प्रत्येक क्षेत्रात लोकशाहीची ताकद पाहायला मिळतेय.

### 12 वर्षांपूर्वीचा काळ आठवून पाहा

» पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी यावेळी भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षावर टीका केली. मोदी म्हणाले, २०१४ मध्ये काय झालं होतं माहितीय ना? २०१४ ही केवळ तारीख नाही तर एक परिवर्तन आहे. २०१४ मध्ये देशात केवळ १०० स्टार्टअप होते, आज देशात १ लाख स्टार्टअप आहेत. तुम्ही १०-१२ वर्षांपूर्वीचा काळ आठवून पाहा. तेव्हा आऊटडेटेड मोबाइल फोनची स्क्रीन सतत हँग व्हायची. तुम्ही त्याची बटनं दाबा, स्क्रीन स्वाईप केली तरी फोन काम करत नव्हते. ते फोन रिस्टार्ट करूनही काहीच होत नव्हतं. अशीच अवस्था देशातल्या तेव्हाच्या सरकारची होती. तेव्हाचं सरकार हँग व्हायचं.

# मी पैसे घेतल्याचा पुरावा आहे?

## मोईत्रांनी स्वतःवरील आरोप फेटाळले

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

मुळे चर्चेत आलेल्या आणि वादात सापडलेल्या तृणमूलच्या खासदार महुआ मोईत्रा यांनी त्यांच्यावर झालेले सगळे आरोप फेटाळले आहेत. आरोप कुणीही करु शकतो. मात्र ते सिद्ध करण्याची जबाबदारी आणि त्याचे पुरावे देण्याची जबाबदारी ही आरोप करणाऱ्याची किंवा तक्रार करणाऱ्याची असते. माझ्या विरोधात जे प्रतिज्ञापत्र देण्यात आलं आहे ते मी वाचलं आहे. त्यात २ कोटी रुपये मला दिल्याचा काहीही उल्लेख नाही असं म्हणत महुआ मोईत्रांनी स्वतःवर झालेले सगळे आरोप फेटाळले आहेत.



महुआ मोईत्रा म्हणाल्या की मी जर प्रश्न उपस्थित करण्याच्या बदल्यात पैसे घेतले होते तर हे कुठल्या तारखेला घडलं होतं जरा ती तारीखही मला सांगा. तसंच मी पैसे घेतले आहेत याचे पुरावेही सादर करा. दर्शन हिरानंदानी यांनी महुआ मोईत्रांना पंतप्रधान नरेंद्र मोदींना अडचणीत आणण्यासाठी गौतम अदाणींबाबत प्रश्न विचारण्यासाठी पैसे दिले होते, हा आरोप भाजपा नेते निशिकांत दुबेंनी केला. त्यानंतर हे प्रकरण समोर आलं. मात्र आता हे सगळे आरोप महुआ मोईत्रांनी फेटाळून लावले आहेत.

### काय आहे हे प्रकरण?

» भाजपाचे खासदार निशिकांत दुबे यांनी लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला यांना पत्र लिहिलं आहे. त्या पत्रात त्यांनी हे म्हटलं आहे की महुआ मोईत्रांविरोधात जे कॅश फॉर क्वेश्नचे आरोप झाले त्या प्रकरणी त्यांची चौकशी केली जावी. तसंच तातडीच्या प्रभावाने त्यांना संसदेतून निलंबित करण्यात यावं. संसदेत महुआ मोईत्रांनी ६१ प्रश्न व विचारले ज्यापैकी ५० प्रश्न हे अदाणी समूहाशी संबंधित होते असंही दुबे यांनी म्हटलं आहे.

महुआ मोईत्रा म्हणाल्या की जे प्रतिज्ञापत्र दिलं गेलं आहे त्यात दर्शन हिरानंदानी यांनीही मला रोख रक्कम दिल्याचा उल्लेख केलेला नाही. माझ्यावर अकारणच २ कोटी रुपये घेतल्याचा आरोप लावला जातो आहे. भाजपाचे खासदार निशिकांत दुबे आणि वकील जय अनंत देहद्रई यांना गुरुवारी संसदेच्या समितीने प्रश्न विचारले. समितीने एक दोनदा नाही १४ वेळा विचारलं की तुमच्याकडे तुम्ही जे आरोप करत आहात त्याचा काही पुरावा किंवा काही कागदपत्रं आहेत का? जर मी पैसे घेतले आहेत आणि दर्शन हिरानंदानी हे सरकारी साक्षीदार आहेत तर तातडीने संसदेच्या पटलावर त्यांनी पुरावे ठेवले पाहिजेत. माझ्यावर आरोप करत आहेत त्यांनी पुराव्यानिशी सांगावं मला कधी आणि कुठे पैसे देण्यात आले? असंही महुआ मोईत्रांनी म्हटलं आहे. ३१ ऑक्टोबरला संसदीय समितीपुढे महुआ मोईत्रा हजर होणार आहेत.

# दुसरं लग्न केल्यास होणार कारवाई!



। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

आसाम सरकारनं सरकारी कर्मचाऱ्यांबाबत मोठा निर्णय घेतला आहे. जोडीदार जिवंत असेपर्यंत दुसरं लग्न करण्यास सरकारनं बंदी घातली आहे. दुसरं लग्न केल्यास दंडात्मक कारवाईचा इशारा सरकारनं दिला आहे. याबद्दल आसाम सरकारच्या कामगार विभागानं आदेश जारी केला आहे. 'पर्सनल लॉ'नुसार दुसरं लग्न करण्याची परवानगी आहे. पण, नवीन आदेशनुसार पती किंवा पत्नी हयात असल्यास दुसऱ्या लग्नासाठी परवानगी घ्यावी लागणार आहे. हा आदेश तात्काळ लागू करण्यात आला आहे. याबद्दल बोलताना आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सर्मा म्हणाले, "हा कायदा आधीपासूनच लागू होता. पण, अंमलबजावणी कधीच झाली नव्हती. आता हा कायदा लागू करण्याचा निर्णय सरकारनं घेतला आहे." दरम्यान, विवाहीत असल्याची माहिती लपवून अथवा आपली खरी ओळख लपवून एखाद्या महिलेबरोबर लग्न किंवा संबंध प्रस्थापित केल्यास गुन्हा ठरणार आहे. अशा प्रकरणांमध्ये १० वर्षांची शिक्षा होऊ शकते. याबद्दल केंद्रीय कायदेविषय संसदीन समितीनं एक अहवाल तयार केला आहे.

# रश्मिकाच्या ॲनिमलमधील 'सतरंगी' गाणं रिलिज!



संदीप रेड्डी वंगा दिग्दर्शित 'ॲनिमल' या चित्रपटाची सध्या सर्वत्र क्रेझ दिसून येत आहे. काही दिवसांपुर्वी या चित्रपटाचा टिझर रिलिज करण्यात आला होता आणि त्यानंतर चाहते या चित्रपटाबाबत अपडेट जाणुन घेण्यासाठी उत्सुक आहेत. नुकतच ॲनिमल मधील पहिलं गाणं रिलिज झालं होत ज्यात रश्मिका आणि रणबीरचा रोमँटिक अंदाज सर्वांनाच आवडला. या गाण्यात दोघांचे लग्न दाखवण्यात आले होते आता निर्मात्यांनी या चित्रपटाचे पुढचे गाणे रिलिज केले आहे. 'ॲनिमल' मधील 'सतरंगा' हे गाणे रिलीज झाले आहे. या गाण्यातही रणबीर आणि रश्मिकाची केमेस्ट्री प्रेक्षकांना दिसत आहे. आत रणबीर आणि रश्मिका एकमेकांवर रोमान्स करताना दिसताय मात्र या गाण्यात दोघांच्या नात्यात खटके उडल्याचे दिसत आहे. 'सतरंगा' या गाण्याला अरिजित सिंगने आपला आवाज दिला आहे, तर गाण्याचे बोल सिद्धार्थ-गरिमाने लिहिले आहेत. श्रेयस पूर्णिक याने संगीत दिग्दर्शन केले आहे.

'सतरंगा' गाण्यात रश्मिका आणि रणबीर करवा चौथ साजरा करताना दिसत आहेत. त्यामुळे यावर्षीच्या करवा चौथला सतरंगा गाण्याचा बोलबाला असणार आहे. यात काही शंकाच नाही. 'ॲनिमल'चे दिग्दर्शन संदीप रेड्डी वंगा यांनी केले आहे. भूषण कुमार या चित्रपटाचे निर्माते आहेत. या चित्रपटात रणबीर कपूर, रश्मिका मंदान्ना, अनिल कपूर आणि बॉबी देओल मुख्य भूमिकेत दिसणार आहेत. रणबीर आणि रश्मिका पहिल्यांदा स्क्रिन शेयर करणार आहे. हा चित्रपट 1 डिसेंबर रोजी थिएटरमध्ये प्रदर्शित होणार आहे.

## केआरके रणवीरवर इतका का भडकला?

करण जोहरचा सर्वात वादग्रस्त आणि चर्चेत असलेला शो 'कॉफी विथ करण'चा 8वा सीझन 26 ऑक्टोबरपासून सुरू झाला. आठव्या सिझनची सुरुवात बॉलिवूडचे पावर कपल रणवीर सिंग आणि दीपिका पदुकोण यांच्या जोडीने झाली. यावेळी रणवीर आणि दीपिकाच्या जोडीची अनेक सिक्रेट चाहत्यांना कळाली आहे. या सिझनमध्ये त्यांनी लग्नाचा व्हिडिओ देखील चाहत्यांना दाखवला आहे. त्याचबरोबर या दोघांनी त्यांची लव्ह स्टोरी चाहत्यांना सांगितली. पहिली भेट कशी आणि कुठे झाली हे रणवीरने सांगितले. मात्र हे सांगताना रणवीरने एक चुक केली ज्यामुळे सोशल मिडियावर तो प्रचंड ट्रोल होत आहे. जेव्हा रणवीर सिंगने दीपिकाला भेटल्याची कहानी सांगितली तेव्हा त्याचे अनेक चाहते आश्चर्यचकित झाले. त्यानंतर नेटकऱ्यांनी त्याचे जुने व्हिडिओ शेअर करत त्याच्यावर टिका केली. आता हाच व्हिडिओ अभिनेता कमाल राशीद खान याने देखील सोशल मिडियावर शेयर केला आहे. हा व्हिडिओ शेयर करत रणवीरला ट्रोल केलं आहे. या शोमध्ये रणवीरने सांगितले की, दीपिकासोबत त्याची पहिली भेट वर्सोवा येथील संजय लीला भन्साळी यांच्या घरी झाली होती. रणवीरने सांगितले की, जेव्हा तो राम-लीलाच्या स्क्रिप्टवर चर्चा करण्यासाठी भन्साळींच्या घरी गेला तेव्हा तो टेबलाजवळ बसला होता आणि दरवाजा समोर होता.

## मनुला छळायला तनु परत येतेय!



कंगना राणौत ही गेल्या काही दिवसांपासून तिच्या आगामी तेजस सिनेमासाठी चर्चेत होती. तिचा हा सिनेमा आज थिएटरमध्ये प्रदर्शित झाला आहे. या चित्रपटाच्या प्रमोशनमध्ये कंगनाने कसलीच कमी ठेवली नाही. कंगनाने तिच्या या चित्रपटासाठी खुप मेहनत घेतली. याच बरोबर दिल्लीत पहिली रावण दहन करणारी महिला कंगना ठरली होती.आता कंगना पुन्हा चर्चेत आली आहे ती तिच्या आगामी सिनेमासाठी. कंगनाने नुकतच IMDB ला एक मुलाखतीत तिच्या आगमी सिनेमाबाबत खुलासा केला आहे. कंगना आता आणखी तीन प्रोजेक्टमध्ये काम करणार आहे ज्यात एक प्रोजक्ट एक विजय सेतुपतीसोबत आहे. हा एक थ्रिलर चित्रपटात असणार आहे. त्याचबरोबर ती 'तनू वेड्स मनु 3' मध्ये पुन्हा तनूच्या भुमिकेत परतणार आहे. IMDB शी बोलताना कंगनाला म्हणाली की, "मी विजय सेतुपती सरांसोबत एक थ्रिलर सुरू करत आहे, आणि नोटी बिनोदिनी नावाचा चित्रपट आहे. तनु वेड्स मनू 3 हा तिचा दुसरा चित्रपट असणार आहे. याचाच अर्थ की कंगनाने तनु वेड्स मनू चा तिसरा भाग प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. आता कंगनाच्या या घोषणेनंतर चाहत्यांमध्ये खुपच आनंद आहे. कंगनाच्या चाहत्यांना तिच्या या चित्रपटाची गेल्या अनेक दिवसांपासून प्रतिक्षा होती. या चित्रपटाचे याआधी दोन भाग प्रदर्शित झाले आहेत, ज्यांना प्रेक्षकांचे खुप प्रेम मिळाले आहे. आता चाहते या चित्रपटाच्या तिसऱ्या भागाची आतुरतेने वाट पाहत आहेत. एकीकडे कंगनाने या चित्रपटाची घोषणा केली आहे तर दुसरीकडे दिग्दर्शक आनंद एल राय यांनी यापुर्वी या चित्रपटाचा सिक्वेल न काढण्याबाबत वक्तव्य केले होते. 2015 च्या एका मुलाखतीत आनंद यांनी या चित्रपटाचा तिसरा भाग बनवणार नाही असे सांगितले होते. आता या वक्तव्यानंतर आनंद दिग्दर्शक म्हणून या चित्रपटात काम करणार की नाही याबाबत प्रेक्षकांना उत्सुकता लागली आहे. तर आर माधवन देखील या चित्रपटाचा भाग राहणार नाही अशा बातम्या यापुर्वी आल्या होत्या. तनु वेड्स मनु रिटर्न्ससाठी कंगनाला सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा राष्ट्रीय पुरस्कार मिळाला होता . आता तिचा तेजस हा चित्रपट प्रदर्शित झाला.

## नारकर यांनी व्यक्त केली मनातली खंत

अभिनेते अविनाश नारकर आणि ऐश्वर्या नारकर यांचं सोशल मीडियावर प्रचंड फॅन फॉलोईंग आहे. गेल्या अनेक दिवसांपासुन ऐश्वर्या आणि अविनाश दोघेही चर्चेत आहेत. अविनाश नारकर सोशल मीडियावर डान्स रिल्स बनवत असतात. त्यावरुन त्यांना अनेकदा ट्रोलही केलं जातं. यावेळी त्यांची पत्नी आणि अभिनेत्री ऐश्वर्या नारकर त्यांना सपोर्ट करताना दिसतात. ऐश्वर्या यांनी सोशल मीडियावर एक रील शेअर करुन मनातली खंत व्यक्त केलीय. ऐश्वर्या यांनी सोशल मीडियावर एक रील शुट केलाय. या रील व्हिडीओत अविनाश - ऐश्वर्या दोघेही रोमँटीक अंदाजात दिसत आहेत. हा रील पोस्ट करुन ऐश्वर्या यांनी कॅप्शनमध्ये लिहीलंय की, सदैव पाठिंबा देणारं आणि काळजी घेणारं कुटुंब दिल्याबद्दल मी सदैव ऋणी आहे... हा माणुस माझ्या आयुष्यात आहे ज्यामुळे मी स्वतःला भाग्यवान समजते" ऐश्वर्या पुढे म्हणतात, "हा 'माणूस' केवळ स्वतःच्या कुटुंबाची काळजी घेत नाही तर त्यासोबतच आर्थिकदृष्ट्या कमकुवत किंवा गरजूंची जबाबदारीही आनंदाने घेतो... हे नक्कीच सोपे नाही. जेव्हा लोकं त्याला ट्रोल करतात तेव्हा मला मनापासून वाटते की तो कोणत्या प्रकारचा माणूस आहे हे एखाद्याला समजले पाहिजे..... लकी प्रत्येक मग तो अविनाश !!!... हा एकदम हॅपी गो माणूस आहे.. तुम्ही जीवाचा आदर करा कोणीही असो... तू एक हिरा आहेस सदैव असाच राहा."




## मुलगा की मुलगी? कोण येणार सईच्या घरी?

सई लोकुर ही मराठी मनोरंजन विश्वातील चर्चेतील अभिनेत्री. सई लोकुरने काहीच दिवसांपुर्वी ती गरोदर असल्याची गुड न्युज सर्वांना सांगितली. सईने गेले अनेक दिवस बेबी बंप दाखवत तिचं खास फोटोशुट केलं आहे. अशातच सई लोकुरने डोहाळेजेवणाचा खास व्हिडीओ शेअर केलाय. यात तिच्यासमोर खीर आणि गुलाबजामच्या वाट्या ठेवल्या होत्या. त्यात सईने कोणती वाटी उचलली पाहा. सई लोकुरने सोशल मीडियावर डोहाळेजेवणाचा व्हिडीओ शेअर केलाय. यात तिच्याशेजारी तिचा पती तीर्थदीप रॉय बसलेला दिसतो. सईच्या समोर दोन वाट्या ठेवल्या असतात. एका वाटीत गुलाबजाम असतो तर दुसऱ्या वाटीत खीर. सई वाटी उचलायला जाते. तिचे सगळे नातेवाईक मुलगा मुलगा म्हणुन ओरडत असतात. आणि सई वाटी उचलते. त्या वाटीत खीर असते. आता यावरुन सई गोंडस मुलीला जन्म देणार का? याची सगळ्यांना उत्सुकता आहे. सई लोकूरने काहीच दिवसांपुर्वी सोशल मिडीयावर एक व्हिडीओ शेअर केला होता. यात तिच्यासोबत तिचा नवरा तिर्थदीप रॉय होता. या व्हिडीओत सईच्या हातात प्रेग्नन्सी कीट पाहायला मिळाली. एकुणच सईने तिच्या फॅन्ससोबत ती आई होणार असल्याची आनंदाची बातमी शेअर केली. सईच्या सर्व फॅन्सनी तिचं अभिनंदन केलं. सई आणि तिर्थदीप या दोघांनी २९ नोव्हेंबर २०२० ला लग्न केलं.

# पाकिस्तानच्या पराभवाचा ‘चौकार’!

## » पाकिस्तान वर्ल्ड कपमधून आऊट झाला का?

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था



**एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेच्या 26 व्या सामन्यात द. आफ्रिकेने पाकिस्तानचा 1 गडी राखून पराभव केला आणि 5 वा विजय नोंदवला. यासह प्रोटीज संघाने गुणतालिकेत अव्वल स्थान गाठले. बंगळूरच्या एमए चिदंबरम स्टेडियमवर प्रथम फलंदाजी करताना पाकिस्तानने सर्व गडी गमावून 270 धावा केल्या. प्रत्युत्तरात द. आफ्रिकेने 47.2 षटकांत 9 गडी गमावून लक्ष्य गाठले. पाकिस्तानकडून शाहीन आफ्रिदीने 3 बळी घेतले. तर मोहम्मद वसीम, हरिस रौफ आणि उसामा मीर यांनी 2-2 विकेट घेतल्या.**

यंदाचा एकदिवसीय विश्वचषक पाकिस्तानसाठी दुःस्वप्नापेक्षा कमी नाही. शुक्रवारी चेन्नईत झालेल्या रोमहर्षक सामन्यात द. आफ्रिकेने त्यांचा अवघ्या एका विकेटने पराभव केला. पाकिस्तानचा स्पर्धेतील हा सलग चौथा पराभव आहे. द. आफ्रिकेसाठी केशव महाराज आणि तबरेझ शम्सी यांनी 10व्या विकेटसाठी 11 धावांची विजयी भागीदारी केली. मोहम्मद नवाजच्या गोलंदाजीवर महाराजने विजयी चौकार ठोकला. एडन मार्करामने 91 धावा केल्या, तर शम्सीने पहिल्या डावात 4 बळी घेतले. 271 धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करण्यासाठी उतरलेल्या द. आफ्रिकेच्या संघाची सुरुवात चांगली झाली. संघाने केवळ 2 षटकांत 30 धावा केल्या. पाकिस्तानकडून इफ्तिखार अहमदने पहिले षटक नव्या चेंडूने टाकले. त्यानंतर डावाच्या दुसऱ्या षटकात डी कॉकने शाहीनची गोलंदाजी फोडून काढली आणि सलग 4 चौकार मारत 19 धावा वसूल केल्या. चौथ्या षटकात द. आफ्रिकेलाही पहिला धक्का बसला. क्विंटन डी कॉक 24 धावा करून शाहीन आफ्रिदीचा बळी ठरला. त्याच्यानंतर टेम्बा बावुमा आणि रॅसी व्हॅन डर डुसेन यांनी डावाची धुरा सांभाळली. पण बावुमाही 10व्या षटकात झेलबाद झाला. त्याला मोहम्मद वसीमने पॅव्हेलियनमध्ये पाठवले. द. आफ्रिकेने 67 धावांत 10 षटकात 2 विकेट गमावल्या. द. आफ्रिकेने पहिल्या 10 षटकांत दोन्ही सलामीवीरांच्या विकेट्स गमावल्या. इथून एडन मार्कराम आणि डुसेन यांनी डाव पुढे नेला. दोघांनी 54 चेंडूत 54 धावांची भागीदारी केली आणि संघाची धावसंख्या 100 धावांच्या पुढे नेली. डुसेन 21 धावा करून बाद झाला. त्यानंतर हेन्रिक क्लासेन फारसे काही करू शकला नाही. तो 12 धावा करून बाद झाला. द. त्यामुळे आफ्रिकेची धावसंख्या 4 गडी बाद 136 अशी झाली. 136 धावांवर 4 विकेट गमावल्यानंतर मार्करामने डेव्हिड मिलरच्या साथीने जबाबदारीने खेळ केला. मार्करामने अर्धशतक पूर्ण केले, तर दुसरीकडे मिलरने उसामा मीरवर हल्ला केला. ही जोडी फोडायला आफ्रिदीला यश आले. त्याने मिलरला झेलबाद केले तेव्हा दोन्ही खेळाडूंनी 70 धावांची भागीदारी केली होती. मिलर 29 धावा करून बाद झाला. मिलरच्या विकेटनंतर मार्करामने मार्को जॅन्सनसह डावाची धुरा सांभाळली. त्याने यान्सन (20) आणि जेराल्ड कोएत्झेसह छोट्या पण उपयुक्त भागिदारी रचल्या. पण मार्कराम 91 धावा करून उसामा मीरच्या गोलंदाजीवर बाबरकडे झेल देऊन तंबूत परतला. त्याच्यापाठोपाठ गेराल्ड कोएत्झे 10 धावा काढून माघारी परतला. त्यामुळे द. आफ्रिकेने 250 धावांवर 8 विकेट गमावल्या. तत्पूर्वी, टॉस जिंकून प्रथम फलंदाजीला आलेल्या पाकिस्तानी संघाला अवघ्या 20 धावांवर पहिला धक्का बसला. डावाच्या 5व्या षटकात अब्दुल्ला शफीक 17 चेंडूत 9 धावा काढून बाद झाला.

### 45 धावा : पाकिस्तानच्या 5 विकेट

» सौद आणि शादाब बाद झाल्यानंतर पाकिस्तानच्या फलंदाजीची पडझड झाली. शादाब 225 धावांच्या धावसंख्येवर बाद झाला, संघाला येथून केवळ 45 धावा करता आल्या आणि शेवटच्या 4 विकेटही गमावल्या. नवाज (24 धावा) व्यतिरिक्त इतर फलंदाज विशेष काही करू शकले नाहीत. शाहीन आफ्रिदी केवळ 2, मोहम्मद वसीम ज्युनियर फक्त 7 धावा करू शकले. हारिस रौफ शून्यावर नाबाद राहिला. पाकिस्तान संघ पुन्हा एकदा पूर्ण 50 षटकेही खेळू शकला नाही. द. आफ्रिकेने त्यांना 46.4 षटकांत 270 धावांत गुंडाळले. पाकिस्तानकडून सौद शकीलने 52 आणि कर्णधार बाबर आझमने 50 धावा केल्या.

# हिटमॅन रोहित रचणार इतिहास!

## » रोहित शर्मा होणार 18 हजारी मनसबदार

।नवी दिल्ली। प्रतिनिधी : महाईन्यूज



**लखनौच्या एकना स्टेडियमवर रविवारी (29 ऑक्टोबर) भारत आणि इंग्लंडचे संघ आमनेसामने येणार आहेत. या लढतीत भारताचा कर्णधार रोहित शर्मा दोन विक्रम नोंदवू शकतो. सध्याच्या विश्वचषकात रोहित कर्णधार आणि फलंदाज म्हणून चमकदार कामगिरी करत आहे. भारतीय संघाला इंग्लंडला पराभूत करून विश्वचषकात विजयाचा षटकार मारायचा आहे. टीम इंडियाच्या सलग पाच विजयांमध्ये कर्णधार रोहितने महत्त्वाची भूमिका बजावली आहे.**

टीम इंडिया इंग्लंडला पराभूत करून उपांत्य फेरीत पोहचण्यासाठी प्रयत्नशील आहे. रोहित शर्मा या सामन्यात 18000 आंतरराष्ट्रीय धावा पूर्ण करू शकतो. हा आकडा गाठण्यासाठी त्याला 47 धावांची गरज आहे. 36 वर्षीय रोहितने आतापर्यंत 456 आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये 43.36 च्या सरासरीने 17963, तर 52 कसोटीत 3677 धावा केल्या आहेत. तसेच 256 एकदिवसीय सामन्यांमध्ये त्याच्या नावावर 10423 धावा असून त्याने 148 टी-20 आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये 3853 धावा फटकावल्या आहेत. रोहितकडे दिग्गज सचिन तेंडुलकर, विराट कोहली, राहुल द्रविड आणि सौरव गांगुली यांच्या क्लबमध्ये पोहोचण्याची सुवर्णसंधी आहे. आतापर्यंत भारताच्या चार फलंदाजांनी 18 हजार किंवा त्याहून अधिक आंतरराष्ट्रीय धावा केल्या आहेत. रोहितने चालू विश्वचषकात 5 सामन्यात 311 धावा केल्या आहेत. या काळात त्याने आपल्या बॅटमधून 1 शतक आणि 1 अर्धशतक झळकावले आहे. इंग्लंडविरुद्ध रोहित शर्मा विराटच्या साथीने शिखर धवनसोबतचा विक्रम मोडू शकतो. वास्तविक, रोहित आणि विराट जोडीने गेल्या महिन्यात आशिया कपमध्ये सर्वात जलद 5000 वनडे धावा करण्याचा विक्रम केला होता. आतापर्यंत दोघांनी 90 एकदिवसीय डावात 5183 धावांची भागीदारी केली आहे. या कालावधीत 18 शतके आणि 17 अर्धशतके फटकावली आहेत. हिटमॅन आणि शिखर धवनचा विक्रम मोडण्यासाठी विराट आणि रोहितला फक्त 11 धावांची गरज आहे. रोहित-धवन या जोडीने वनडेत 5193 धावांची भागीदारी केली आहे.

# रिझवान-यानसेनची बाचाबाची

नवी दिल्ली। प्रतिनिधी : महाईन्यूज

चेन्नईच्या चेपॉक स्टेडियमवर करो या मरो या सामन्यात पाकिस्तानचा दक्षिण आफ्रिकेशी सामना होत आहे. हा स्पर्धेतील 26 वा सामना आहे. पाकिस्तानने सलग तीन सामने गमावले आहेत आणि विश्वचषक स्पर्धेत त्यांना आपले आव्हान कायम ठेवण्यासाठी द. आफ्रिकेविरुद्धची लढत जिंकणे आवश्यक आहे. काही दिवसांपूर्वीच चेपॉकच्या मैदानावर अफगाणिस्तानने पाकिस्तानचा पराभव केला होता.

तर दुसरीकडे धर्मशाला येथे नेदरलँडविरुद्ध पराभूत होण्याव्यतिरिक्त द. आफ्रिकेचा संघ अव्वल दर्जाच्या फॉर्ममध्ये दिसत आहे. या सामन्यात पाकिस्तानचा मोहम्मद रिझवान आणि दक्षिण आफ्रिकेचा मार्को यानसेन यांच्यात जोरदार वादावादी झाली. रिझवानने चांगली सुरुवात केली, पण 31 धावा करून तो बाद झाला. त्याचवेळी यानसेनने या सामन्यातही चांगली सुरुवात करत पाकिस्तानच्या दोन्ही सलामीवीरांना बाद केले. अब्दुल्ला शफीक 9 तर इमाम उल हक 12 धावा करून बाद झाले. यानंतर बाबर आझम आणि मोहम्मद रिझवान यांच्या जोडीने पाक संघाचा डाव सावरण्याचा प्रयत्न केला. प्रथम फलंदाजी करताना पाकिस्तानने पहिल्या सहा षटकांत एक गडी गमावून 38 धावा केल्या होत्या. यानंतर मार्को यानसेन आपल्या स्पेलचे चौथे षटक टाकण्यासाठी आला. पहिल्या आणि दुसऱ्या चेंडूवर एकही धाव झाली नाही, तिसऱ्या चेंडूवर इमामने चौकार मारण्याचा प्रयत्न केला आणि यष्टीरक्षक क्लासेनकडे झेलबाद झाला.